# चेन्नईसमोर पंजाबच ठरला 'किंग्स'

## प्रियांश आर्याचे तुफानी शतक | १८ धावांनी मिळविला विजय

**मोहाली, दि. ९ :** पंजाब किंग्सच्या घरच्या मैदानावर पंजाबने चेन्नई सुपर किंग्सला पराभूत केले आहे. पंजाबच्या संघाने चेन्नईला १८ धावांनी पराभूत केले आहे. आयपीएल २०२५ चा २२ वा सामना पीसीए न्यू इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर खेळवला गेला. या पंजाब किंग्स या स्पर्धेमधील तिसरा विजय आहे तर पंजाब किंग्स या स्पर्धेचा तिसरा विजय आहे. या सामन्यांमध्ये प्रियांश आर्या याने संघासाठी कमालीची फलंदाजी केली, या युवा खेळाडूच्या जोरावर पंजाब किंगच्या संघाने २१९ धावांचे लक्ष्य चेन्नई सुपर किंग्ससमोर लक्ष्य उभे केले होते. त्याचबरोबर शशांक सिंह याने सुद्धा संघासाठी दमदार फलंदाजी केली.

चेन्नई सुपर किंग्सच्या संघाने या सामन्यातही विशेष कामगिरी केली नाही. चेन्नईचे सलामीवीर फलंदाज डेव्हॉन कॉन्वे आणि रचिन रवींद्र चांगली सुरुवात करून दिली होती. संघासाठी डेव्हॉन कॉन्वे याने संघासाठी ४९ चेंडूंमध्ये ६९ धावा केल्या, त्यानंतर त्याला संघाने रिटायर आऊट करण्यात आले. रचिन रवींद्र याने या संघासाठी मोठी खेळी खेळली नाही त्याने या सामन्यात २३ चेंडूंमध्ये ३६ धावा केल्या. चेन्नईचा कर्णधार ऋतुराज गायकवाड आणखी एकदा फेल ठरला. ऋतुराजने संघासाठी ३ चेंडू खेळले आणि १ धाव घेऊन लोकी फर्ग्युसन याने बाहेरचा रस्ता दाखवला.

चेन्नई सुपर किंग्सच्या गोलंदाजांची पंजाब किंग्सच्या फलंदाजांनी चांगलीच धुलाई केली आहे. खलील अहमदने संघासाठी २ विकेट्स घेतले तर मुकेश चौधरी याने संघासाठी १



विकेट घेतला. त्याचबरोबर रविचंद्रन अश्विनने संघासाठी २ विकेट्सची कमाई केली. पर्पल कॅप होल्डर नूर अहमदने संघासाठी १ विकेट घेतला.

पंजाब किंग्सच्या फलंदाजीबद्दल सांगायचे झाले तर प्रभसिमरण सिंह या सामन्यात मोठी कामगिरी करू शकला नाही. प्रियांश आर्याने संघासाठी शतकीय खेळी खेळली आणि त्याच्या जोरावर पंजाब किंग्सच्या संघाला मोठी धावसंख्या उभी करण्यात यश मिळाले. प्रियांशने संघासाठी ४२ चेंडूंमध्ये १०३ धावा केल्या. पंजाबचा कॅप्टन श्रेयस अय्यर या सामन्यांमध्ये त्याने चांगली कामगिरी केली नाही. शंशाकने संघासाठी ३६ चेंडूंमध्ये ५२ धावा केल्या. मार्को जासॅन याने १९ चेंडूंमध्ये ३४ धावा केल्या. या पराभवासह चेन्नईच्या संघाने सलग चार पराभवाना सामोरे जावे लागले आहे. तर पंजाब किंग्सने ३ विजय नावावर केले आहेत.

---

## निवडक

### नार्वे येथील महारुद्र वीर हनुमान मंदिरात १२ रोजी हनुमान जयंती

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ९ :** नार्वे येथील श्री महारुद्र वीर हनुमान मंदीरात शनिवार दि. १२ रोजी हनुमान जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ६ वाजता हनुमान जन्मोत्त्सव,दुपारी महापूजा आरती, महानैवेद्य. सायंकाळी ७ वाजता नार्वे देऊळवाडा भजनी मंडळातर्फे भजन. रात्री १० वाजता बोर्डेकर दशावतारी मंडळाचा दशावतारी नाट्यप्रयोग.

सर्वांनी या उत्सवाला उपस्थित राहून तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा तसेच नाटकाचा आनंद लुटावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### बाहेरीलवाडा केरी-सत्तरी येथे १२ रोजी श्री हनुमान जन्मोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ९ :** बाहेरीलवाडा केरी-सत्तरी येथील हनुमान मंदिर येथील श्री हनुमान जन्मोत्सव शनिवार दि.१२ एप्रिल रोजी श्री शंकरनाथ मठ बाहेरीलवाडा येथे साजरा करण्यात येणार आहे.यानिमित्त संध्याकाळी ६.३० वाजता मान्यवरांच्या व भाविकांच्या उपस्थितीत श्री विठ्ठल रखुमाई दिंडी पथक विर्डी सांखळी यांच्या दिंडीच्या जयघोषात श्री हनुमान पालखीचा मिरवणूक सोहळा संपन्न होणार आहे.या सोहळ्याला वाळपई मतदार संघाचे आमदार तथा आरोग्यमंत्री विश्वजित राणे, पर्येच्या आमदार तथा वन विजास महामंडळाच्या अध्यक्ष डॉ. देविया राणे उपस्थित राहणार आहेत.

पहाटे ६.३० वाजता श्री हनुमान जन्मसोहळा,पाळणागीते व आरती, सकाळी ८ वाजता हनुमान चालिसा पठण महायज्ञ (१०८ वेळा), सकाळी १०.३० वाजता श्री सत्यमारुती व्रत पूजा, दुपारी १ वाजता आरती व महाप्रसाद, संध्याकाळी ५ वाजता स्थानिक कलाकारांतर्फे भजनाचा कार्यक्रम, रात्री ११ वाजता चेंदवणकर गोरे दशावतार नाट्य मंडळातर्फे 'ऋतुमती हरण' हे नवीन दर्जेदार नाटक सादर केले जाणार आहे. सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी, असे आवाहन अध्यक्ष व कार्यकारी मंडळातर्फे करण्यात आले आहे.

### मांद्रे नारोबा मंडपात आज वस्त्रहरण नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ९ :** मांद्रे जूनसवाडा येथील श्री नारोबा देवस्थानचा वर्धापनदिन निमित्त गुरुवार दि. १० रोजी संध्याकाळी ९ वाजता वस्त्रहरण नाटक सादर होणार आहे.

या निमित्त सकाळी सग्राह सहोम,लघुरुद्र स्वाहाकार,दुपारी आरती,तीर्थप्रसाद,महाप्रसाद होईल. संध्याकाळी ९ वाजता कला परिवार मांद्रे आयोजित आणि शायनिग स्टार नाट्यमंडळ, निगळ पेडणे दोन अंकी धमाल विनोदी नाटक वस्त्रहरण होईल. या नाटकाचे दिग्दर्शन रुपेश कवठणकर, पार्श्वसंगीत शांताराम कवठणकर, तबला ओंकार अमेरकर, ढोलक अमेय गावडे, संवादिनी योगेश मराठे, ध्वनि सिद्धेश नाईक, नेपथ्य प्रकाशयोजना सोपटे नाटयभांडार, पार्से यांची आहे.

या नाटकात पपी कवठणकर,राज मावलंकर, वासू गडेकर, स्वयं सिंग, सुजित कोरगावकर, कल्पेश मावळकर, अँथनी फर्नांडिस, भूषण पेडणेकर, तारकानाथ म्हाल दार, विशाल गडेकर, प्रशांत गडेकर, सखाराम गडेकर, अमर गडेकर, अक्षय गडेकर, कमलेश मावळकर, विष्णू गडेकर, सोनिया शेट्ये, दीक्षा वेंगुर्लेकर यांच्या भूमिका आहेत. या नाटकाचे आयोजन व पुरस्कर्ते मनोहर आनंद म्हामल आहेत. तरी नाट्य रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

### मांद्रे हनुमान मंदिरच्या वर्धापनदिनानिमित्त आजपासून भरगच्च कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ९ :** मधलामाज येथील श्री हनुमान देवस्थानचा ४ था वर्धापनदिन सोहळा गुरुवार दि. १० ते सोमवार दि. १४ रोजीपर्यंत भरगच्च कार्यक्रमानी साजरा करण्यात येणार आहे.

यानिमित्त गुरुवार १० रोजी यजमानास प्रायश्चित्त विधी, देव देवतांना श्रीफळ अर्पण, प्रार्थना, गणपती पूजन स्वस्तिपुण्याहवाचन, आचार्यादि ऋत्विक वरण, मुख्य देवता स्थापना श्री हनुमान देवतांना लघुरुद्रदीजप, अभिषेक, महापूजा नंतर संग्रह लघुरुद्र स्वहाकार, बलिदान पूर्णहूती, आरती तीर्थप्रसाद महाप्रसाद होईल. या सोहळ्याचे यजमान श्री. व सौ. शोभा सुरेश राऊळ आहेत. संध्याकाळी ५ वाजता भजन कार्यक्रमात मनोहर पोखरे उद्देश पेडणेकर विजय पाळणी, समीर पेडणेकर साहिल म्हामल व नीलेश वळवईकर व संध्याकाळी ७ वाजता दीपोत्सव होईल. शुक्रवार दि. ११ रोजी, सकाळी धार्मिक विधी नंतर १० वाजता श्री सत्य हनुमान महापूजा, दुपारी १ वाजता आरती, तीर्थप्रसाद, महाप्रसाद होईल. या दिनाचे यजमान कु सुरज सुरेश राऊळ व महाप्रसाद सौजन्य प्रदीप सावंत आहे. संध्याकाळी ७.३० वाजता वैभवी क्रिएशन डिचोलीतर्फे विनोदी नाटक अबोल प्रीतीची अजब कहाणी सादर होईल. शनिवार दि. १२ रोजी पहाटे ५ वाजता श्री हनुमान जन्मोत्सव यजमान सौ. व श्री. रेश्मा रमेश पोखरे, त्यानंतर भविकातरफे दिंडी कार्यक्रम व सकाळी ८ पासून अभिषेक खुला आहे. संध्याकाळी ६ वाजता स्वरगणेश भक्ती व भाव गीतांचा कार्यक्रम होईल. या कार्यक्रमात सारेगमप व इंडियन आयडॉल फेम श्री गणेश मेस्त्री मुंबई व कु अर्चना कामुलकर याना साथसंगत बुधेश तळकर,समीर पेडणेकर व उद्देश पेडणेकर (ऑर्गन) यांचे असून रमेश परशुराम पोखरे यांनी पुरस्कृत केला आहे.त्यानंतर रात्री १०.०१ मी. हनुमान बाल नाट्य मंडळातर्फे दोन नकी कोकणी नाटक इच्छा परा त्याच येता घरा सादर होईल.

रविवार १३ रोजी सकाळी एकादशमी, यजमान शुभम पोखरे आहेत. दुपारी ३ वाजता महिलांसाठी सारिका शिरोडकर यांचा हटके कार्यक्रम होणार आहे.रात्री ९ वा हनुमान बाल नाट्यमंडळातर्फे संगीत स्वामी सामर्थ्याचा नाटक होणार आहे. सोमवार दि. १४ रोजी सकाळी धार्मिक विधी,सकाळी १० वा श्री सत्यनारायण महापूजा, यजमान श्री. व सौ. सानिका शामसुंदर पोखरे, दुपारी १ वा आरती, तीर्थप्रसाद व महाप्रसाद होईल. रात्री १० वाजता जय संतोषी दशावतार नाट्य मंडळातर्फे थांब लक्ष्मी कुंकू लावते सादर होणार आहे. या सगळ्या उत्सवाचे पौरोहित्य श्री बाळकृष्ण जोशी व सहकारी ब्रह्मवृंद तर्फे करण्यात येईल. अभिषेक करण्यासाठी भाविकांनी ९०४९१२५६३६ संपर्क साधावा. तरी भाविकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

### मुळगाव सरकारी माध्यमिक विद्यालयाचा १०० टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ९ :** सरकारी माध्यमिक विद्यालय मूळगाव हायस्कूलचा दहावीचा निकाल सलग तिसऱ्यांदा १०० टक्के लागला. परीक्षेला बसलेल्या एकूण २० विद्यार्थ्यांपैकी २ विद्यार्थी विशेष श्रेणीत, ५ प्रथम श्रेणीत तर १३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. विशाखा विजय गावडे ८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. काजल मनिषकुमार यादव ७६ टक्के गुण मिळवून विद्यालयात द्वितीय आली तर सारिका मोहन विश्वकर्मा ७२ टक्के गुण मिळवून विद्यालयात तृतीय स्थान मिळवले. सलग तीन वर्षी या विद्यालयाचा निकाल १०० लागला आहे. विद्यालयात ग्रामीण भागातील विद्यार्थी शिकत असल्याने कोणतेही शिकवणी घेत नसतात तरी सर्व शिक्षकांच्या मेहनतीने योग्य नियोजन यामुळे ही परंपरा कायम राखली आहे. या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्वाती आंरोदेकर यांच्या जवळ सरकारी माध्यमिक विद्यालय मुळगाव व सरकारी माध्यमिक विद्यालय शिरोडवाडी मुळगाव अशा दोन विद्यालयांचा ताबा असून दोन्ही विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला आहे. उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखल्याबद्दल विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापक व शिक्षकवर्गाचे पालक व ग्रामस्थांतर्फे अभिनंदन करण्यात आले.

---

# दामोदर विद्यालयाचा शालान्त परीक्षेचा १०० टक्के निकाल

टीम दैनिक हेराल्ड



**आगोंद, दि. ९ :** लोलये-काणकोण येथील श्री दामोदर विद्याप्रसारक संस्थेच्या श्री दामोदर विद्यालयाने यंदाही शालांत परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेतील एकूण ३५ विद्यार्थ्यांनी परीक्षेला हजेरी लावली होती, त्यापैकी १० विद्यार्थ्यांनी विशेष श्रेणी, १६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, तर ९ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीत यश मिळवले आहे.

उत्तम कामगिरी करणारे विद्यार्थी - उत्तेज सतरकर - ९०% गुण मिळवत विद्यालयात प्रथम. सुजल वेळीप ८५.८३% गुणांसह द्वितीय, तसेच कृषी विषयात १००/१०० गुण मिळवून विशेष यश, सुमुख सुधीर - ८३.८३% गुणांसह तृतीय, गौरव सुधीर ८०.८३% गुणांसह चौथा, हविश कोंकरे - ७९.३३% गुणांसह पाचवा.

विद्यालयाच्या सातत्यपूर्ण यशाबद्दल दामोदर विद्याप्रसारक संस्थेचे अध्यक्ष विश्वजित वारीक आणि पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षा अंजली तळेकर यांनी विद्यार्थ्यांचे, मुख्याध्यापक जितेंद्र आमशेकर यांचे, आणि शिक्षकवर्गाचे अभिनंदन केले आहे.

शाळेच्या संस्थेतर्फे चालवलेले मुलांचे वसतिगृह आणि सेवा संकल्प संस्थेद्वारे चालवलेले कन्या वसतिगृह गोवा राज्यातील विविध भागांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी उत्कृष्ट सुविधा प्रदान करत आहेत. या वसतिगृहांमध्ये राहणारे मुले आणि मुली दोघेही श्री दामोदर विद्यालयात शिक्षण घेत असून, त्यांनी शैक्षणिक आणि सर्वांगीण प्रगतीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांच्या पालकांनी शाळेतील शिक्षक, वसतीगृह कर्मचारी, आणि व्यवस्थापनाचे विशेष कौतुक केले आहे.

---

# सतत वाचन करा : प्रा. अनिल सामंत



दळे : पुस्तक प्रकाशन करताना प्रा. अनिल सामंत व मान्यवर.

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ९ :** संपूर्ण देशाला जोडणारी लोक संस्कृती गोव्यात आहे. चांगले जीवन जगणारे चांगले लिखाण करतात. रंजन नव्हे सृजन संस्कृतीचा आविष्कार करणे सहज होते. पुस्तकात जीवन कसे उपयोगी होऊ शकते, यांचे उत्तर प्राप्त होते. त्यामुळे वाचन सतत करत राहावे. असे विचार गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष अनिल सामंत यांनी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर त्यांच्यासह ज्ञान प्रबोधिनी मंगळाचे अध्यक्ष चेतन मंजू देसाई, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ सुचेता नाईक, माजी आमदार विजय पै खोत, सामाजिक कार्यकर्ते व लेखक शांताजी नाईक गावकर, लोक कलाकार व लेखक अजित पैंगीणकर, साहित्यिक कमलाकर म्हाळशी, श्री मल्लिकार्जुन देवस्थान समिती अध्यक्ष राजेंद्र देसाई, आदी उपस्थित होते.

देळें, काणकोण येथील श्री मल्लिकार्जुन व चेतन मंजू देसाई महाविद्यालयाचा मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने निवृत्त मुख्याध्यापक व सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक शांताजी नाईक गावकर यांचे गाठोडे अनुभवाचे (चारोळ्या), तसेच जेष्ठ पत्रकार व लोक वेदाचे अभ्यासक अजित पैंगीणकर यांचे संचिताचे देणे या दोन पुस्तकांचा विमोचन सोहळा आज दि.९ रोजी, येथील श्री मल्लिकार्जुन महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता.सुरुवातीला संदीप नाईक गावकर यांनी स्वागत केले.

साहित्यिक कमलाकर म्हाळशी यानी दोन्ही पुस्तक परिचय करून वाचन या विषयी विचार व्यक्त करतानाच आजच्या वाचन संस्कृती विषयी खंत व्यक्त केली.

लेखक अजित पैंगीणकर, शांताजी नाईक गावकर, माजी आमदार विजय पै खोत डॉ सुचेता नाईक, प्रमदा देसाई यांनी मनोगत व्यक्त करतानाच लेखकांना शुभेच्छा दिल्या.

या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन महाविद्यालयाच्या प्राध्यापिका दिव्या चंद्रेकर यानी केले.

अध्यक्ष चेतन मंजू देसाई यांनी अध्यक्षीय भाषणात दोन्ही व्यक्तिमत्त्वाचे कौतुक करून दोन्ही लेखकाना शुभेच्छा दिल्या. आयोजकातर्फ व्यासपीठावरील मान्यवरांना स्मृतिचिन्ह प्रदान केले.

शांताजी नाईक गावकर यांच्या यापुर्वी माझी माणसे माझ्या आठवणी, हे मराठी पुस्तक प्रकाशित झालेले असून श्री अजित पैंगीणकर यांचे हे १५ वे पुस्तक आहे. त्यांच्या गावांतील माणसांच्या कथा या पुस्तकाला गोवा मराठी अकादमीचा पं. महादेव शास्त्री जोशी पुरस्कार प्राप्त झालेला आहे.काणकोणच्या या दोन्ही लेखकांच्या पुस्तकांना गोवा मराठी अकादमीचे प्रकाशन पूर्व आर्थिक सहाय्य लाभलेले आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी प्राध्यापिका अंकीता धोंड यांनी आभार मानले तर मराठी विभाग प्रमुख दिव्या चंद्रेकर यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

---

# निराकार विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ९ :** श्री निराकार शिक्षण संस्था माशें काणकोण संचलित श्री निराकार विद्यालयाची विद्यार्थिनी विभुती विदेश भैरेली हिने शालांत परीक्षेत ९५.१% टक्के गुण मिळवून काणकोण तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळविला. श्री निराकार विद्यालयांतून एकुण ४१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यांतील ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले व विद्यालयाचा निकाल ९७.५० टक्के लागला. याच संस्थेतर्फे गांवडोंगरी येथे चालविण्यात येणा-या तुडल हायस्कूलमधील ३४ विद्यार्थ्यांपैकी ३३ विद्यार्थी उत्तीर्ण होवून एकंदर निकाल ९%% लागला.या विद्यालयाच्या प्राची गांवकर हिने ८५.८० टक्के गुण मिळवून विद्यालयांत प्रथम क्रमांक पटकावला. निराकार विद्यालयाचे १० विद्यार्थी विशेष श्रेणीत, २१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व ९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत पास झाले तर तुडल हायस्कूलमधील ११ विद्यार्थी विशेष श्रेणीत, १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व ६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत पास झाले. एका विद्यार्थ्याला एटीकेटी मिळाली. वर्ष पद्धती प्रमाणे यावर्षीही दोन्ही शाळांचा गुणवत्तापूर्ण निकाल आणल्या बद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रशांत नाईक यांनी दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक ऊर्वी फळदेसाई व तुकाराम वेळीप तसेच शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

---

# झारखंडकडून गोव्याचा ६-२ गोलने धुव्वा

## आसामने कर्नाटकचा २-० ने पराभव : ड्रीम स्पोर्ट्स चॅम्पियनशिपमध्ये विजय

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ९ :** ड्रीम स्पोर्ट्स चॅम्पियनशिप फुटबॉल २०२५ च्या मुलींच्या राष्ट्रीय अंतिम फेरीत दुसऱ्या दिवशी झारखंडने यजमान गोवाचा ६-२ असा दणदणीत पराभव करून प्रभावी विजय नोंदवला. ही सामने दक्षिण गोव्यातील ड्क्र उतोर्डा मैदानावर खेळवले गेले.

पहिल्या सत्रात झारखंडने ४-२ अशी आघाडी घेतली. झारखंडकडून रश्मी मिन्झ हिने १४व्या मिनिटाला पहिला गोल केला. त्यानंतर गोवाकडून नेहा वर्लेकर हिने १९व्या मिनिटाला बरोबरी साधली.

यानंतर झारखंडने सलग दोन गोल करत ३-१ अशी आघाडी घेतली. कर्णधार अल्का इंदवार हिने ३३व्या मिनिटाला आणि



संजना ओरांव हिने ३९व्या मिनिटाला गोल केले. पहिल्या सत्राच्या अतिरिक्त वेळेत अनामिका सांगाने झारखंडसाठी चौथा गोल केला.


दुसऱ्या सत्रातही झारखंडचा वर्चस्व कायम राहिले. मधल्या फळीतील शौलिना डांग हिने ४८व्या मिनिटाला आणखी एक गोल करत आघाडी वाढवली. त्यानंतर सांगाने ६७व्या मिनिटाला आपला दुसरा गोल नोंदवत झारखंडला गोवावर मोठा विजय मिळवून दिला.

दुसऱ्या सकाळच्या सामन्यात आसामने कर्नाटकचा २-० असा सहज पराभव केला. हे दोन्ही गोल पहिल्या सत्रात झाले. करिना नराह हिने ८व्या मिनिटाला आणि सेर्बिरिका तरांगपी हिने ३५व्या मिनिटाला गोल करून संघाला विजय मिळवून दिला.

उद्या मुलांचे सामने - बेणाउलीम मैदानावर ८.३० रा - डेम्पो विरुद्ध रिलायन्स फाउंडेशन संध्याकाळी ५.३० - फुटबॉल ४ चेंज विरुद्ध पंजाब, उतोर्डा मैदानावर ८.३० रा - मोहन बागान एसजी विरुद्ध चेन्नई यिन एफसी ५:३० सेसा विरुद्ध नॉर्विच सिटी एफसी.

---

# स्वर गंधार कला केंद्र नास्नोळातर्फे संगीत सभा



■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ९ :** स्वर गंधार कला केंद्र नास्नोळातर्फे १७ वी संगीत सभा सादर करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून गोव्याचे नामवंत नाट्य कलाकार रमाकांत अणवेकर उपस्थित होते.

पुष्प रोपटे देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनकरून कार्यक्रमास सुरवात झाली. सर्वप्रथम स्वागत गीत सादर करण्यात आले, त्यानंतर गौरांश शिरोडकर याने शिवाजी महाराजांची भूमिका साकारून एकपात्री अभिनय सादर केला. तबला शिक्षक गौतम परब यांच्या मार्गदर्शनाखाली यश नेमळेकर, प्रियांशु घाडी आणि कृषय शिरोडकर यांनी तबला एकल वंदन केले.

हार्मोनियम शिक्षिका सिद्धी दाभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजवीर मुळगावकर, स्वरा साखळकर, आयुषी मांद्रेकर, माया अस्नोडकर, अर्चना साखळकर, आणि आद्या नावेलकर यांनी तीन गटात हार्मोनियम सह वादन सादर केले.

पखवाज शिक्षक गोपिकांत शिरोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली अमित नाईक, दत्ताराम कांबळी आणि केनिषा शिरोडकर यांनी पखवाज सहवादन सादर केले. गायन शिक्षिका श्रद्धा केरकर यांच्या मार्गदर्शनाखाली दशरथ घाटवळ, सानिका पार्सेकर, प्रिती शिरोडकर, रेणु तुवेकर, एकनाथ कांदोळकर आणि केशव मनोज पोळे यांनी अभंग, नाट्यसंगीत, बंदिश आणि भैरवी गायन केले. त्यांना हार्मोनियम साथ रामा नाईक तर तबला साथ गोपिकांत शिरोडकर यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काशी शिरोडकर, ध्वनी संकलन अमित नाईक, कार्यक्रम प्रयोजन पुंडलिक बांदोडकर आणि आभार प्रदर्शन दिलीप म्हालदार यांनी केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २१६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 216 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .